# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २२.०६.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा युनिट क्र. ३ व पोलीस ठाणे लकडगंज पोलीसांची कामगिरी :— जिवे ठार मारणारे आरोपी व विधीसंघर्षीत बालक ताब्यात.**

फिर्यादी मोहम्मद उजैर खान वल्द मोहम्मद उमर खान ,वय ३६ वर्ष, रा. घर क्र. ५४०९, जामा मस्जीद जवळ, वॉर्ड नं. ०८, मौदा, जि. नागपूर यांचा साळा नामे अब्दुल रहमान उर्फ रम्मु वल्द अब्दुल रज्जाक, वय अं. ३८ वर्ष रा. मुद्लीयार ले—आऊट, लाल नगर, शांतीनगर नागपूर हा तसेच, त्याचा मित्र नामे परमेश्वर उर्फ ईश्वर उर्फ पेलू उर्फ पप्पू संतोष पटेल, वय ३२ वर्षे, रा. मिनीमातानगर, कळमना, नागपूर आणि त्याचे काही ईतर सहकारी हे गुन्हेगारी स्वरूपाचे असून ते सोबत मिळून गुन्हे करतात. परमेश्वर उर्फ ईश्वर याचे एका गुन्ह्याची माहिती अब्दुल रहमान उर्फ रम्मुने पोलीसांना दिल्याने परमेश्वर व त्याचे ईतर साथीदार यांना अटक झाली होती. या कारणामूळे रम्मूचा खेळ होणार अशी माहिती रम्मुचे मित्रांनी फिर्यादी यांना दिली होती. त्यावरून फिर्यादी यांनी त्याचा साळा नामे अब्दुल रहमान उर्फ रम्मु यास परमेश्वर उर्फ पप्पू याचे सोबत न राहणेबाबत समजाविले होते. तरीही फिर्यादीचा साळा हा परमेश्वर उर्फ पप्पू सोबत फिरत व राहत असे. दिनांक २१.०६.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास फिर्यादीचा साळा व त्याचा मित्र परमेश्वर उर्फ पप्पू हे दोघे पोलीस ठाणे लकडगंज हद्दीतील राहते घरून स्मशान घाट चौकाकडे पायदळ गेले होते. फिर्यादीचा साळा रात्रभर घरी आला नाही. दिनांक २२.०६.२०२६ चे ०७.०० वा. चे सुमारास, त्याचा मृतदेह ईतवारी रेल्वे स्टेशनचे मालधक्का लगतचे कच्च्या रस्त्यावर मिळून आला. फिर्यादीचे साळा नामे अब्दुल रहमान उर्फ रम्मु वल्द अब्दुल रज्जाक यास कोणीतरी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरुन, अज्ञात धारदार शस्त्राने गळ्यावर वार करून तसेच, चेहऱ्यावर, कानावर, डोक्यावर मारुन त्यास जिवानिशी ठार केले. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि. आदर्श भंडारे ७५५८०९७१०१ यांनी आरोपींविरूध्द कलम १०३(१),२३८,६१(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ३ व लकडगंज पोलीसांनी संयुक्तीकरित्या तपास सुरू केल्यावर, सिम्बा (SIMBA) ॲपचा वापर करून मृतकाची ओळख तथा गुन्हे तपशीलाची तपासणी केली असता, मृतक तथा आरोपी १) परमेश्वर उर्फ ईश्वर उर्फ पेलू उर्फ पप्पू संतोष पटेल, वय ३२ वर्षे, रा. मिनीमातानगर, कळमना, नागपूर हे एकमेकांचे परिचीत व सहकारी असल्याचे तथा चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांची संबंधीत असल्याची पोलीसांना माहिती प्राप्त झाली. तसेच, फिर्यादीचे संशयावरून आरोपी क्र. १ याचेबाबत गोपनीय तथा खात्रीशीर माहितीवरून व तांत्रिक तपास करून आरोपी क्र. १ यास ताब्यात घेतले. आरोपीस गुन्ह्याबाबत विचारणा केली असता, त्याने त्याचा साथीदार आरोपी क्र. २) राहुल अनुज उईके, वय १९ वर्षे रा. डिप्टी सिग्नल, कळमना, नागपूर व एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी 'मृतक हा आरोपींची

बेकायदेशीर हालचालींची माहिती पोलीसांना देत असल्याचे संशयाचे' कारणावरून, आरोपींनी संगणमत करून फिर्यादीचा साळा नामे अब्दुल रहमान उर्फ रम्मु वल्द अब्दुल रज्जाक यास कटाने मालधक्का परिसरात नेवून धारदार शस्त्राने त्याचे गळ्यावर तसेच, शरीरावर ईतर ठिकाणी वार करून जिवानीशी ठार केल्याची कबूली दिली. आरोपी क्र. १ व २ यांना अटक करून, विधीसंघर्षग्रस्त बालकास ताब्यात घेण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन) मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. मुकुंद कवाडे, दुपोनि. मनोज चौधरी व त्यांचे तपास पथक तसेच, गुन्हेशाखा युनिट ३ चे पोनि. श्री. अतुल मोहनकर व त्यांचे पथकाने संयुक्तीकरित्या केली.

**<u>२) कपिलनगर पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत. सध्या नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत संपूर्ण नागपूर शहरात पोलीस अधिकारी व अंमलदार हे **अंमली पदार्थ विरोधी सप्ताह मोहीम** राबवित आहेत.

दिनांक २२.०६.२०२६ चे ०२.४५ वा. ते ०५.०० वा. चे दरम्यान, कपिलनगर पोलीसांना खात्रीशीर माहिती मिळाली की, प्रियांशु नावाचा ईसम पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत शाक्यमुनि बुध्द विहारजवळ अंमली पदार्थ एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता येणार आहे. अशा प्राप्त माहितीवरून घटनास्थळी सापळा रचुन रेड कारवाई केली असता, प्राप्त वर्णनाचा ईसम पायदळ येतांना दिसल. त्यास पोलीसांनी थांबविण्याचा प्रयत्न केला असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करून, ताब्यात घेतले त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव प्रियांशु विजय गजभिये, वय २३ वर्षे, रा. प्लॉट नं. ४३, चॅटर्जी ले—आऊट सुगतनगर, कपिलनगर, नागपुर असे सांगीतले. एन.डी.पी.एस. कायद्याचे तंतोतंत पालन करून पंचासमक्ष त्याची अंग झडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे खिश्यात एका झिपलॉक पन्नीमध्ये ०२.१२ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ आयफोन, असा एकुण ६०,६००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे कपिलनगर येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री सत्यवान बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सतिश आडे, दुपोनि. राजेश पाटील, पोउपनि. योगेश नाल्टे, पोअं. मुकेश हलमारे, संजू, रितेश, सागर यांनी केली.

**३) कपिलनगर पोलीसांची कामगिरी :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २२.०६.२०२६ चे १०.१५ वा. ते १०.४५ वा. चे दरम्यान, कपिलनगर पोलीसांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गुरूनानक फॉर्मसी कॉलेजसमोर प्रदिप गुप्ता नावाचा ईसम शस्त्र बाळगून उभा आहे. अशा प्राप्त माहितीवरून घटनास्थळी गेले असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा ईसम दिसून आला. त्यास ताब्यात घेवून पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव प्रदिप मिश्रीलाल गुप्ता, वय २५ वर्षे रा. भंते आनेद कौशल्यानगर, गल्ली नं. ०१ जवळ, अनिल ठाकुर यांचे घरी किरायाने कपिलनगर नागपूर असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आंत कंबरेत एक लोखंडी चाकू कि. २५०/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकू बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कपिलनगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री सत्यवान बंडीवार, सहा. पोलीस आयुक्त (जरीपटका विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. सतिश आडे, पोउपनि. अविनाश खटके, पोहवा. शाहजाद शेख, पोअं. सागर बघेल, रितेश वर्मा व मुकेश यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २०.०६.२०२६ चे २१.३० वा. ते २३.५५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीत, चंद्रमणीनगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्याजवळ, कामठी, जि. नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी मिनाक्षी त्रिनयन बोरकर वय ४० वर्षे ह्या आपले कामावर गेले असता व त्यांचा मुलगा याने राहते घराला कुलुप लावुन फिर्यादीला घरी आणण्यासाठी गेला. तेथून फिर्यादी व त्यांचा मुलगा दोघेही पारशीपूरा येथे आईकडे जेवणासाठी गेले. दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, आलमारीतील रोख २,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला होता.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नविन कामठी येथे पोउपनि. संदीप भिताडे ८९७५९६९७९४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीचा शोध घेवून, आरोपी नामे १) शेख जाफर वल्द मुजाफर शेख, वय ४५ वर्षे रा. कामगार नगर मस्जीद जवळ नविन कामठी, नागपूर २) मोहम्मद सोहेल मोहम्मद अफजल, वय २६ वर्षे, रा. कोळसा टाल, कामठी नागपूर यांना अटक केली आहे व पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे राणाप्रतापनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादीचा मुलगा नामे शेख जमाम वल्द शेख करीम, वय १६ वर्षे, रा. राहुलनगर, सोमलवाडा, तफन कॉलोनी, गजानन मंदीर जवळ, नागपूर हा व त्याचा मित्र ओमप्रकाश मोहड असे दोघे होन्डा शाईन मोटरसायकल क्र. एम. एच. ४० ई.व्हि. ३३४० ने डबलसिट धनवटे नॅशनल कॉलेज येथे खाजगी कामाने गेले होते. तेथून परत घरी येत असता, दिनांक २२.०६.२०२६ चे १४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे राणाप्रतापनगर हद्दीत छत्रपती हॉलसमोरील कटींगवरून युटर्न घेवून छत्रपती चौकाकडे जात असतांना त्यांचे

मागून येणारे अज्ञात चारचाकी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचा मुलगा व त्याचा मित्र बसलेल्या मोटरसायकलला मागून धडक देवुन, घटनास्थळावरून पळून गेला. अपघातामध्ये फिर्यादीचे मुलाला गंभिर मार लागल्याने त्यास उपचारकामी कल्पवृक्ष हॉस्पीटल व तेथून मेडीकल हॉस्पीटल ट्रॉमा सेंटर येथे दाखल केले होते. उपचारादरम्यान दिनांक २२.०६.२०२६ चे ०९.३० वा. चे सुमारास, डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलास तपासून मृत घोषित केले. फिर्यादीचे मुलाचा मित्र ओमप्रकाश मोहड याचा उपचार करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी शेख करीम वल्द शेख रमजान वय ४४ वर्षे, रा. राहुलनगर सोमलवाडा, तफन कॉलोनी, गजानन मंदीर जवळ, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रतापनगर येथे मसपोनि. श्रध्दा वाघ ८३२९२९५२७६ यांनी अज्ञात चारचाकी वाहन चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १२५(अ), १२५(ब), १०६(१), भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्रं. ६२, नागपुर. | ६२०४२२१ /२०१९ | कलम ५००, ३४ भा.दं.वि. | पवन साहेबराव वानखेडे, रा. जैन हाऊस, झिरो माईल, सिताबर्डी, नागपूर | ०१.०७.२०२६ |

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे बेलतरोडी</u> :—** कु. रीया प्रशांत मंडपे, वय १९ वर्षे, रा. सनफ्लॅग सोसायटी, प्लॉट नं. ०१, के/ऑफ, चिंचोली नागपूर यांचे घरी किरायाने ही दिनांक २०.०६.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट केस— काळे लांब, अंगात— फिक्कट स्काय ब्लु रंगाचा शर्ट व त्यावर पांढऱ्या रंगाची लाईन असलेल्या काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेले आहे. पायात बटरफ्लॉय चप्पल पोपटी रंगाची घातलेली आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**<u>२) पोलीस ठाणे मानकापूर</u> :—** कु. जया सुरेश आझादे, वय २२ वर्षे, रा. पिटेसुर पाण्याचे टाकी जवळ, नागपूर ही दिनांक १७.०६.२०२६ रोजी पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **<u>वर्णन</u>** रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— मध्यम, उंची— ४ फुट ८ इंच, केस— काळे लांब, अंगात— पोपटी रंगाचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेले आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**<u>३) पोलीस ठाणे वाडी</u> :—** कु. अंश रविंद्र ढोरे, वय १२ वर्षे, रा. टेकडीवाडी, दुर्गामाता मंदीरजवळ, बाबारावजी किरणेवाले यांचे घरी किरायाने, वाडी, नागपूर हा दिनांक १३.०६.२०२६ चे ११.०० वा. पोलीस ठाणे वाडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा

शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग– गोरा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ४ फुट ५ इंच, केस– काळे, अंगात– निळ्या रंगाची हाफ टी–शर्ट व निळ्या रंगाचा फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतो. ओळख– दोन्ही पायापैकी एका पायावर काळे तीळ आहे.


रीया


जया


अंश

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**